**<u>नियमित दिवाणी दावा क्र. २६६/१९९३ मधील निशाणी १९० खालील आदेश.</u>**

(सावित्रा सपकाळ वि. पांडूरंग सपकाळ व इतर )

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे कैफियत दुरुस्ती करणेसाठी परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

**<u>प्रस्तुत अर्जातील प्रतिवादी क्र. १० व ११ चे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–</u>**

२. वादी हिने सुरुवातीला तीचे सासरे प्रतिवादी क्र. १ यांच्या विरुध्द कोरेगांव तालुक्यातील कण्हेरखेड येथील वाद मिळकत वाटप करुन मागितली. तदनंतर वेळोवेळी दुरुस्ती करुन प्रतिवादी क्र. १० व ११ यांच्या ताब्यात सातारा तालुक्यातील कोंढवली (लिंब) येथील शेत मिळकती व घर मिळकती या दाव्यामध्ये समाविष्ठ करुन त्यात वाटप मागितले. त्याप्रमाणे मौजे माथेराण ता. कर्जत, जि. रायगड येथील सी. स. नं. ३११ ही मिळकत दाव्यामध्ये दुरुस्तीद्वारे समाविष्ठ करण्यात आली.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ हे कण्हेरखेड येथील जमीन मिळकती व घर मिळकती सोडून वादीला सामील आहेत. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. १४ व १६ हे वादीला सामील असुन वादीच्या मागणीप्रमाणे त्यांनी कैफियत देवुन मौजे कण्हेरखेड, कोंढवली व माथेराण येथील मिळकतीतील त्यांचा हिस्सा मागीतला आहे.

४. प्रस्तुत कामी वादीने तीचा जबाब न्यायालयात देण्यापुर्वी प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी त्यांच्या कैफियतीद्वारा वाटपाची भुमीका मांडल्याने त्यांनी पुरावा सुरु करावा असा आदेश झाला. त्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १० यांनी त्यांचा सरतपास निशाणी ७९ ला दिनांक ०८/१०/२००८ रोजी दिला. उलटतपास वादी तर्फे दिनांक १६/०१/२०१२

रोजी घेण्यात आला. वादी व प्रतिवादींनी ज्या बाबी दावा दुरुस्ती व कैफियतीमध्ये मांडल्या त्याबाबतचा खुलासा प्रतिवादी क्र. १० व ११ यांचे कैफियत दुरुस्तीमध्ये येणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १० व ११ हे कैफियत परिच्छेद क्र. २ नंतर २अ वेगळी समाविष्ठ करुन त्यामध्ये ''मौजे वेलंग ता. वाई येथे रंगनाथ बळवंत थिटे या ब्राम्हणाची कुळहक्काने जमीन हरीचे काळापासुन होती. सदर हरी मयत झाल्यानंतर महादेव हे सदर मिळकत कुळहक्काने वहिवाटीत होते. त्यांना पांडूरंग हे त्यांचे भाऊ मदत करत होते. सदर ७ एकर पैकी साधारणः अडीच एकराची राजवड या नावाची जमीन ही कुळहक्काने एकत्र कुटुंबामध्ये राहीली. सदर जमीनीमध्ये पांडूरंग हे व्यक्तीगत केव्हाही कुळ नव्हते एकत्र कुटुंबासाठी सदरची मिळकत कुळ हक्काने होती. सदर कुळ हक्काच्या जमीनीच्या मोबदल्यात एकत्र कुटुंबाला काही मिळकती पुनरवसनामध्ये मौजे कण्हेरखेड ता. कोरेगांव येथे मिळाल्या. पुर्वीच्या वाटपाप्रमाणे सदरच्या मिळकती पांडूरंगकडे गेल्यातर मौजे कोंढवली येथील मिळकत यांना गेल्या. महादेव व पांडूरंग यांचा भाऊ आण्णा हा पुर्वीच मयत झाला असल्यामुळे आण्णाच्या मुलीच्या लग्नासाठी पैसे नसल्यामुळे आण्णाच्या बायको व मुलाने पुनरवसनात गेलेल्या जमीनीचे जे पैसे आले त्यापैकी १/३ हिस्सा म्हणून २,०००/– रुपये महादेवकडे मागीतले. सदर पैसे गावातील प्रतिष्ठीत मंडळी व पंचासमक्ष महादेव यांनी आण्णाच्या बायको व मुलास दिले. त्या मोबदल्यात त्यांनी वाड वडीलार्जीत मिळकतीमधील त्यांचा हक्क स्वःखुशीने सोडून दिला तसा लेख झाला आहे. सदर बाब दडवुन आण्णांचे हयातीत वारसांनी प्रस्तुत दाव्यात खोटी व चुकीची कैफियत दिली''.

५. तसेच ''महादेव हे केस कर्तनाचा व्यवसाय करत होते. त्यांनी सन १९२५ चे दरम्यान मौजे माथेरान ता. कर्जत येथे मोकळ्या जागेत व्यवसाय चालु केला. सदर

काळामध्ये इंग्रजांची राजवट होती. महादेव यांनी इंग्रज अधिकाऱ्याकडून सदर जागा भाडेपट्टयांने घेवुन त्याठिकाणी स्वकष्टाने पत्र्याचे घर तयार केले. महादेव हे गावी असुन पांडूरंगला हाताशी धरुन गावातील शेती व कुळाची जमीन वाटप होईपर्यंत पाहत होते. सदर माथेरानचे जागेचा सध्याचा सिटीसर्वे नं. ३११ असुन सदर मिळकतीस आण्णा, पांडुरंग व त्यांचे वारसांचा काडीमात्र हक्क संबध पोचत नव्हता व नाही. सिटीसर्वे नं. ३१ हा महादेवचा एकट्याचा आहे. याबाबत भाडेपट्टा करार असुन त्याबाबत कोर्टाचा निकाल सुध्दा महादेवच्या बाजुचा आहे.''

६. तसेच प्रतिवादी क्र. १० व ११ कैफियतीमध्ये २ब समाविष्ठ करुन ''मौजे कोंढवली येथील जमीन व घर जमीनीमध्ये महादेवचा एकट्याचा हक्क असल्याने त्यांनी सन १९८६ साली गणपत सपकाळ यांचे नावात बक्षीसपत्र करुन ठेवले होते. त्याप्रमाणे सदर मिळकत गणपत यांच्या वहिवाटीस आली आहे. सदर बक्षीसपत्र वादी यांनी रद्द करुन मागितलेले नाही. सदर बक्षीसपत्र हे वादी व इतरांच्यावर बंधनकारक आहे. नंतर महादेवचे वारस सदाशिव याने सुध्द हक्कसोडपत्र केले आहे. त्याबाबत वादींना माहीती असुन सुध्दा त्याचा उल्लेख दाव्यात केलेला नाही. प्रस्तुत कामी वादीने दावा मिळकतीमध्ये ज्यांचा हक्क पोहचु शकतो अशा हरीच्या दोन मुली बबई पांडूरंग शिर्के व वेनुताई आनंदा पवार यांचे वारसांना प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी म्हणून सामील केलेले नाही. त्यामुळे प्रस्तुत दाव्यास आवश्यक पक्षकार नसलेल्या तत्वाची बाधा येते. प्रतिवादी क्र. २ व ३ चे कैफियतीमधील हरी माथेरान येथील नाभीक कामासाठी गेला होता हे कथन तसेच ११/०३/२०१० रोजी अनोंदणीकृत मृत्युपत्राने प्रतिवादी क्र. २ व ३ यांना पांडूरंग यांची स्वःकष्टार्जीत मिळकत मिळाली येणे प्रमाणे कथन खोटे असल्याने ते मान्य व कबुल नाही'' असा मजकुर

कैफियतीमध्ये समाविष्ठ करु इच्छीतात.

७. प्रतिवादींच्या मते प्रतिवादी मागत असलेली कैफियत दुरुस्ती ही वादीच्या उशीरा दावा दुरुस्ती व इतर प्रतिवादींच्या कैफियत दुरुस्तीमुळे मागावी लागत आहे. प्रस्तावीत दुरुस्तीमुळे वादी व इतर प्रतिवादींच्या केसवर कोणताही परिणाम होणार नाही. प्रस्तावीत कैफियत दुरुस्ती ही न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करुन प्रतिवादी क्र. १० व ११ यांना कैफियत दुरुस्ती करण्याची परवानगी द्यावी अशी विनंती प्रतिवादी क्र. १० व ११ तर्फे करण्यात आली.

८. वादी यांनी सदर अर्जास निशाणी १९२ वर म्हणणे दाखल करुन तीव्र आक्षेप नोंदविला. वादीच्या मते प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी कैफियत दुरुस्तीचा दिलेला अर्ज हा कायदेशीर नाही. प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र. १० व ११ यांचा पुरावा संपलेला आहे. त्यांचा सरतपासात जबाब होवुन उलटतपास झालेला आहे व आता वादीच्या उलटतपासाकरीता काम नेमलेले आहे. प्रतिवादी यांनी कैफियतीतील कथने फार पुर्वीच दिलेली आहेत. सदरचा दावा हा २८ वर्ष जुना झालेला आहे. प्रतिवादी हे प्रकरण लांबविण्याचा प्रयत्न करीत आहेत. वास्तवीक दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाव्याचे काम सुरु झाल्यानंतर कैफियत दुरुस्तीचा अर्ज दाखल करता येणार नाही. प्रतिवादीने योग्य तत्परता दाखविल्या बाबतचा उल्लेख त्यांच्या अर्जामध्ये नमूद नाही. पुर्वी प्रतिवादी क्र. १० व ११ यांचे कैफियतीमधील अर्जातील कथनांच्या विसंगत असे कथन केलेले आहे. आण्णा यांनी हक्क सोडल्या बाबतचा मजकुर गेल्या २८ वर्षात कधीही मांडला गेलेला नाही. तसेच आण्णा व पांडूरंग यांचा माथेरान येथील मिळकतीमध्ये हिस्सा नाही हे ही कथन नव्याने कैफियतीमध्ये मांडण्याचा प्रयत्न चालु आहे. सन १९८६ सालचा

वाद मिळकतीबाबतचा निर्णय हा महादेव यांच्या मिळकतीत हक्क संपुर्ण एकट्याचा आहे असा निर्णय झाला तरच त्याबाबत विचार करता येईल. तसेच पुर्नरविलोकनाचे मिळकती बाबत कलेक्टर यांची पुर्व परवानगी शिवाय हस्तक्षेप करता येत नाही ही बाब लक्षात घ्यावी लागेल. एकंदरीतच दाव्याच्या चौकशीचे काम अंतीम टप्यांत आले आहे. प्रतिवादीने अर्जामध्ये योग्य तत्परता याबाबतचा कोणताही उल्लेख व उशीरा बाबतचा कोणताही उल्लेख केलेला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करण्यास कोणताही वाव नाही. निव्वळ प्रकरण लांबविण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती वादीतर्फे करण्यात आली.

९. प्रतिवादी क्र. २ याने प्रतिवादी क्र. १० ते ११ यांनी दाखल केलेल्या कैफियतीत दुरुस्तीच्या अर्जाला निशाणी १९४ वर म्हणणे दाखल करुन तीव्र आक्षेप नोंदविला. प्रतिवादी क्र. २ याने वादीच्या कथनाप्रमाणेच त्यांचे म्हणणे याकामी सादर केले आहे. प्रतिवादी क्र. २ यांनी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

१०. वरीलप्रमाणे प्रतिवादी चा अर्ज त्यावरील वादीचे म्हणणे व इतर कागदपत्रे पाहता तसेच वादी व प्रतिवादी यांचे सुविद्य विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकता खालील मुद्दे माझे विचाराधीन आहेत. त्यावरील निष्कर्ष व त्यांची कारणमिमांसा खालीलप्रमाणे.

| **अ.न.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | प्रस्तावीत दुरुस्ती ही दाव्यातील खरेखुरे प्रश्न निकाली काढण्यासाठी आवश्यक आहे काय ? | होय. |
| २ | नियोजीत कैफियत दुरुस्ती ही दाव्याचा अंतीम निकाल करण्यास मदत करणारी आहे का? | होय. |

| | | |
|---|---|---|
| ३. | काय आदेश? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## <u>कारणमिमान्सा</u>

**<u>मुद्दा क्र. १ व २ करीता–</u>**

११. वरील दोन्ही मुद्दे संलग्न असल्यामुळे ते एकत्रीत विचाराधीन घेतलेले आहेत.

१२. वादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, वादीने सदरचा अर्ज हा सुनावणीची सुरुवात झाल्यानंतर कोणतीही योग्य तत्परता न दाखविता दाखल केला आहे. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ मधील सुधारीत तरतुदीनुसार सदरचा अर्ज हा मंजूर करता येणार नाही. याउलट प्रतिवादी क्र. १० व ११ यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, सन १९९३ च्या दाव्याला दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ मधील सुधारीत तरतुदी लागु होत नाहीत. तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ मधील जुन्या तरतुदी नुसार दुरुस्ती अर्ज केव्हाही दाखल करता येवु शकतो. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादींनी त्यांच्या युक्तीवादाला दुजोरा देण्यासाठी ***सी. डी. वरधराजन वि. एस. मोहन सी. आर. पी. नं. १४१९/२००७*** या मा. मद्रास उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचा दाखला दिला. वरील न्यायनिर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने खालील प्रमाणे निष्कर्ष काढलेले आहेत.

> ***"As the present suit was filed in the year 1999, the proviso annexed to Rule 17 of Order 6 C.P.C. is not applicable to the present prayer for amendment and no duty is cast upon the Court to record the reasons as to the aspect that the plaintiff***

***inspite of his due diligence could not make the amendment prior to the commencement of the trial.”***

वरील निष्कर्षावरुन दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ मधील दुरुस्ती ही दुरुस्ती पुर्वीच्या दाव्यांना लागु नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे वरील न्यायनिर्णयातील मा. उच्च न्यायालयाचे निष्कर्ष याकामी लागु पडतात.

१३. प्रस्तुतचा दावा हा वादी याने वाद मिळकतीचे वाटप होवुन त्याचा सरस निरस मानाने अलग व तुटक हिस्सा मिळावा यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी सदर दाव्यास आक्षेप नोंदवुन त्यांची कैफियत दाखल केली आहे. प्रस्तुत प्रकरणात वादी यांनी निशाणी ३० व ८७ प्रमाणे दावा दुरुस्ती करुन मागीतली आहे. प्रस्तावीत दुरुस्तीने प्रतिवादी क्र. १० व ११ हे मौजे कण्हेरखेड व माथेराण येथील मिळकती संदर्भात व मौजे कोंढवली येथील मिळकती संदर्भातचे त्यांचे कथन त्यांच्या कैफियतीमध्ये समाविष्ठ करु इच्छीतात. प्रस्थापीत कायद्याच्या तत्वानुसार कैफियत दुरुस्तीचा अर्ज निकाली काढत असताना न्यायालयाचे मत हे उदार असले पाहीजे. प्रस्तुत दाव्याचे खरेखुरे प्रश्न निकालात काढण्यासाठी प्रस्तावीत दुरुस्ती ही आवश्यक आहे. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादीने त्याचे कैफियतीमध्ये व अर्जामध्ये विसंगत कथने केलेली आहेत. येथे नमूद करण्यासारखी गोष्ट अशी की, प्रस्तावीत कायद्याच्या तत्वानुसार प्रतिवादी हा त्याच्या कैफियतीमध्ये कोणत्याही प्रकारचा बचाव घेवु शकतो. त्यामुळे वादीने केलेल्या युक्तीवादामध्ये कोणतेही तथ्य असल्याचे दिसुन येत नाही.

१४. प्रस्तुत प्रकरणात वादीने दाव्यामध्ये दुरुस्ती करुन मौजे माथेराण व

कोंढवली येथील मिळकती संदर्भात दादी मागितल्या आहेत. त्यामुळे त्या संदर्भामध्ये स्पष्टीकरण प्रतिवादी कडून येणे अपेक्षीत आहे. त्यामुळे प्रतिवादीचा बचाव बदलणार नाही. तसेच वादीच्या केसवरही कोणताही परिणाम होणार नाही. दाव्यामधील खरेखुरे प्रश्न निकाली काढण्यासाठी प्रस्तावीत दुरुस्ती ही आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी सदरचा अर्ज दाखल करण्यासाठी जो विलंब केला आहे त्याबद्दल प्रतिवादी क्र. १० व ११ वर खर्च बसविणे न्यायोच्चीत होते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश.**

१. निशाणी १९० वरील अर्ज ३०००/– रुपयांच्या खर्चावर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावीत दुरुस्ती मुदतीत करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ATUL BHIMRAO PATIL
Date: 2022.02.23 13:04:54 +0530

कोरेगाव

दि. २३/०२/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.